# ३२ हजार ५४० असाक्षरांची रविवारी परीक्षा

## दहावी-बारावीनंतर आता आजी-आजोबा सोडवणार पेपर

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** उल्हास नवसाक्षरता अभियानांतर्गत गेल्या वर्षभरात स्वयंसेवकांनी साक्षरतेचे धडे दिलेल्या जिल्ह्यातील ३२ हजार ५४० असाक्षरांची येत्या रविवारी (दि. २३) परीक्षा होणार आहे. दहावी-बारावी विद्यार्थ्यांची परीक्षा नुकतीच संपली. त्यानंतर आता ही आजी-आजोबांची परीक्षा होत आहे.

केंद्र पुरस्कृत उल्लास नवसाक्षरता कार्यक्रमांतर्गत २०२२-२३ ते २०२६-२७ या कालावधीत साक्षरता मोहीम राबविली जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात २०२४-२५ या वर्षात २८ हजारांचे उद्दिष्ट मिळालेले आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम जिल्ह्यात सुरू आहे. जिल्ह्यात नेमलेल्या स्वयंसेवकांमार्फत १५ वर्षे व त्याहून अधिक वयोगटातील असाक्षर व्यक्तींमध्ये वाचन, लेखन व संख्याज्ञान विकसित करून त्यांच्यामध्ये महत्त्वपूर्ण जीवन कौशल्य विकसित करावयाची आहेत. या कौशल्यामध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरूकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण या बाबींचा समावेश आहे.

जिल्ह्यातील १३ हजार १३४ स्वयंसेवकांनी गेल्या वर्षभर जिल्ह्यात उद्दिष्टापेक्षा जास्त म्हणजे ३२ हजार ५४० असाक्षरांची नोंदणी केली आहे. त्यांची मूल्यमापन चाचणी रविवारी (दि. २३) होणार आहे. अजूनही कोणाची नोंदणी झालेली नसेल तर त्यांनी नोंदणी करण्यासाठी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना संपर्क करावा. त्यांनाही रविवारी परीक्षा देता येईल. जिल्ह्यातील १०० टक्के असाक्षरांना या परीक्षेत उपस्थित ठेवून परीक्षा घेण्याचे आवाहन डायटचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, शिक्षणाधिकारी अशोक कडूस (माध्यमिक) व शिक्षणाधिकारी बाळासाहेव बुगे (योजना) यांनी केले आहे.

**जिल्ह्यात ४ हजार केंद्र**

असाक्षर प्रौढांनी ज्या शाळेतून नोंदणी केली, ती शाळाच त्यांचे परीक्षा केंद्र राहणार आहे. यात बहुतांश केंद्र ही गावातील जिल्हा परिषद किंवा माध्यमिक शाळा आहेत. गेल्यावर्षी आठ हजार प्रौढ साक्षर झाले होते.

**दीडशे गुणांची परीक्षा**

दीडशे गुणांच्या या परीक्षेत वाचन, लेखन आणि संख्याज्ञान या घटकांवर प्रत्येकी ५० गुणांचे प्रश्न असतील. उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक घटकात ३३ टक्के म्हणजे किमान १७ गुण मिळवावे लागणार आहेत. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत प्रौढांना आपल्या सोयीनुसार कधीही शाळेत जाऊन दीड तासात ही परीक्षा देता येईल.

# श्रीक्षेत्र सरालाबेट येथे सद्गुरू नारायणगिरी महाराज यांच्या १६ वी पुण्यतिथीचे आयोजन

**माळवाडगाव (वार्ताहर)–** शनिवार दि. २२ मार्च रोजी श्रीक्षेत्र गोदाधाम सरालाबेट येथे सद्गुरू नारायणगिरी महाराज यांची १६ वी पुण्यतिथी साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्ताने सकाळी १० वाजता मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. सद्गुरू गंगागिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने महंत रामगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली सालाबादप्रमाणे यावर्षीही सद्गुरू नारायणगिरी महाराज यांची १६ वी पुण्यातिथी हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात भक्तीभावाने साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्ताने शनिवारी सकाळी १० वाजता महंत रामगिरी महाराज यांचे कीर्तन होईल. किर्तनानंतर संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक जिल्ह्यातील भाविकांच्यावतीने पुरणपोळी तसेच येवला, नांदगाव तालुक्यातील भक्तमंडळीच्या वतीने मांडे, दुध, आमटी अशा महाप्रसाद पगंती होईल. तरी भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सद्गुरू गंगागिरी महाराज ट्रस्ट विश्वस्त मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# नगरच्या ३० तीर्थक्षेत्रांना ४३ कोटींचा निधी- पालकमंत्री विखे

- सराला बेट विकासकामांसाठी ४९८ कोटी
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मस्थळ विकासकामांसाठी ४१३ लाख
- भैरवनाथ मंदिर परिसर सुशोभिकरणासाठी ४९.९९ लाख
- कोतुळेश्वर महादेव मंदिर विकासकामांसाठी १५० लाख
- राहुरी बुद्रुक येथील खंडोबा महाराज मंदीर परिसर सुशोभिकरणासाठी २० लाख

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत जिल्ह्यातील ३० तिर्थक्षेत्रासाठी ४३ कोटी ६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. जिल्ह्याच्या तिर्थक्षेत्र पर्यटनाच्यादृष्टीने मोठी उपलब्धी असल्याचे त्यांनी सांगितले.

पर्यटनस्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेशिक पर्यटन योजना महायुती सरकारने जाहीर केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने सर्व जिल्ह्यातील प्रमुख तिर्थक्षेत्रांच्या विकासासाठी १४९ कोटी ७६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. नगर जिल्ह्याच्या तिर्थक्षेत्र विकासातून पर्यटन आणि रोजगाराच्या संधी निर्माण होण्यासाठी मागील काही वर्षात जिल्ह्यातील तिर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू केले होते. जिल्ह्यातील महत्वपूर्ण आशा तिर्थक्षेत्रांच्या विकास कामांचे प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्यात आले होते. त्याप्रमाणे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील तिर्थक्षेत्रांच्या ३० कामांकरीता निधी उपलब्ध व्हावा, म्हणून दाखल झालेल्या प्रस्तावांना मंजूरी मिळण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला होता.

यात संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील श्री बिरोबा महाराज देवस्थान परिसराची पर्यटन विकास योजनेअंतर्गत सुधारणा व सुशोभिकरण करणासाठी ४९२ लाख, ओझर खुर्द येथील नेमबाई मंदिर परिसर सुशोभिकरणासाठी २५ लाख, निंबाळे येथील मोठेबाबा मंदिर (मच्छिंद्रनाथ मंदिर) परिसर सुशोभिकरणासाठी २५ लाख, अंभोरे येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसर सुशोभिकरणासाठी १४.६ लाख, कोल्हेवाडी येथील काशी विश्वेश्वर मंदिर परिसर सुशोभिकरणासाठी २५ लाख, धांदरफळ खुर्द येथील बिरोबा मंदिर परिसर सुशोभिकरणाठी १९.८ लाख, धांदरफळ खुर्द येथील श्री बिरोबा देवस्थान परिसर सुशोभिकरणासाठी १५ लाख, साकूर येथील श्री विरभद्र देवस्थान परिसर सुशोभीकरणासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. श्रीरामपूर तालुक्यातील सरला बेट येथील गंगागिरी महाराज संस्थान येथील विकास कामांसाठी ४९८ कोटी, उंदिरगाव ते श्री क्षेत्र सरलाबेट राज्यमार्ग २१० (माळेवाडी ते सरालावेट ७ कि.मी.) या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणासाठी ५०० लाख मंजूर आहेत.

जामखेड तालुक्यातील चोंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मस्थळ विकास कामांसाठी ४१३ लाख, श्री क्षेत्र खर्डा येथील सिताराम बाबा देवस्थान मंदीर सभामंडप व महंत सभा मंडपासाठी ३०० लाख, तर पारनेर तालुक्यातील निघोज येथे मळगंगा देवी परिसरात पर्यटन विसावा केंद्र बांधकामासाठी २५० लाख, मळगंगा देवी परिसरात पर्यटन भोजन कक्ष बांधकाम करणे व संरक्षण भिंत बांधकामासाठी १३० लाख, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ ते मंदिर कुंड रस्ता कॉक्रोटीकरणासाठी ६५ लाख, निघोज येथील मळगंगा देवी परिसर सुशोभिकरणासाठी ५५ लाख मंजूर झाला आहे. पाथर्डी तालुक्यातील चिंचपूर येथील श्रीक्षेत्र दर्शन मंदिर परिसर सुशोभिकरण व सभामंडपासाठी ४०.६६ लाख, श्री क्षेत्र मोहटादेवी जगदंबा माता येथील घाट दुरुस्तीसह सुधारणा करण्यासाठी २०० लाख, घाटशिरस येथील वृध्देश्वर देवस्थान मंदिर परिसर सुशोभिकरणासाठी ४९.९९ लाख, संत तुकाराम महाराज मंदिर परिसर सुशोभिकरण करणे १५०.४९ लाख रूपये या योजनेतून उपलब्ध होणार आहेत. श्री क्षेत्र मढी ते तिसगाव (इजिमा ३३३) रस्त्याची सुधारणा कामासाठी ३४० लाख, मोहटा देवी येथे ध्यान धारणा केंद्र व बहुउद्देशिय सभागृह बांधण्यासाठी ५५.२२ लाख मंजूर झाले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे येथील भैरवनाथ मंदिर परिसर सुशोभिकरणासाठी ४९.९९ लाख आणि राहुरी तालुक्यातील कणगर येथील कनकावती माता मंदीर सभामंडप बांधकामासाठी ३५ लाख, म्हैसगाव येथील केदारेश्वर महादेव मंदीर सभामंडप बांधकामासाठी २० लाख, राहुरी बुद्रुक येथील खंडोबा महाराज मंदीर परिसर सुशोभिकरणासाठी २० लाख, ब्राम्हणगाव येथील श्री जगदंबा माता देवस्थान परिसर सुशोभिकरणासाठी ४९.६६ लाख तसेच अकोले तालुक्यातील निंब्रळ येथील अंबिका माता देवस्थान ट्रस्ट येथे सुशोभीकरणासाठी २०० लाख, कोतुळ येथील कोतुळेश्वर महादेव मंदीर विकासकामांसाठी १५० लाख तर शेवगाव तालुक्यातील आव्हाने येथील गणपती मंदीर सभामंडप बांधण्यासाठी ५० लाख मंजूर झाले आहेत. अहिल्यानगर जिल्हयातील ३० कामांसाठी सुमारे ४३ कोटी ६ लाख रुपये निधी मंजूर झाल्याने तिर्थक्षेत्र विकासाच्या कामास मोठी गती मिळेल असा विश्वास पालकमंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला.

पान १ वरुन

## यंदाही मान्सून चांगला बरसणार

वापर करून एप्रिल ते जुलै दरम्यानचा अंदाज वर्तवला जातो. त्यामध्ये दक्षिण गुजरात, गोवा, किनारी कर्नाटक, उत्तर कर्नाटक, तेलंगणा तर महाराष्ट्रातील मुंबई, कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मान्सून पूर्व पावसाची शक्यता अपेकनं वर्तवली आहे तर उत्तर भारतातील जम्मू आणि काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंडमधील काही भागांमध्ये पाऊस थोडा कमी होण्याची शक्यता आहे. म्हणजे महाराष्ट्रात विदर्भ वगळता बहुतांश भागात एप्रिल ते जून दरम्यान पावसाची शक्यता आहे. अर्थात अवकाळी पावसाचा हा अंदाज आहे.

तसेच जुलै ते सप्टेंबर दरम्यान रायलसीमा, दक्षिण कर्नाटका, तमिळनाडू आणि केरळच्या काही भागांत पावसाची कमी शक्यता आहे. तसेच गुजरात आणि दक्षिण राजस्थानच्या काही भागांमध्ये देखील कमी पावसाची शक्यता आहे. तर उर्वरित देशात मात्र सरासरी ते सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज अपेकनं दिला आहे. त्यामुळे मान्सूनमधील पाऊस शेतकऱ्यांना साथ देईल अशी शक्यता आहे. परंतु महिनावार पावसाच्या अंदाजात मात्र अपेकनं पावसाच्या तूटीचेही संकेत दिले आहेत.

**मे महिन्यात पाऊस कुठे?**

मे महिन्यात संपूर्ण राजस्थान, पंजाब, जम्मू आणि काश्मीर-लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड आणि झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या काही भागात पावसाचे संकेत नाहीत. पण याउलट देशाच्या उर्वरित भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे, तर केरळ, कर्नाटक किनारी आणि गोवा येथे जास्त पाऊस पडण्याचा अंदाज अपेकनं व्यक्त केला.

## मांदाडे समिती शिफारसींवर...

त्याबाबत नागरिकांना हरकती असल्यास त्या हरकती १५ मार्च २०२५ पर्यंत नोंदविणे आवश्यक होते. त्याबाबत कोपरगाव मतदार संघातील पाणी प्रश्नाची सखोल माहिती असणारे ज्येष्ठ अभ्यासक व पाटबंधारे विभागाचे निवृत्त अभियंता यांची रविवार दि.०२ मार्च रोजी कोपरगाव येथे संयुक्त बैठक घेऊन कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या सभासद शेतकऱ्यांच्या वतीने हरकती नोंदविण्याबरोबरच समन्यायी पाणी वाटपाची न्यायालयीन लढाई यापुढे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतलेला असून गोदावरी लाभक्षेत्रावर पुन्हा एकदा होणारा अन्याय दूर करण्यासाठी नगर-नाशिकच्या लोकप्रतिनिधींना एकत्र आणून महायुती शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. मांदाडे समितीच्या प्रसिद्ध केलेल्या अहवालातील शिफारशीतील आकडेमोड काही मजकूराचा स्पष्टपणे बोध होत नसल्यामुळे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने हा अहवाल पुन्हा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरून प्रसिद्ध करण्यात आला आहे. गोदावरी लाभक्षेत्रातील कित्येक नागरिकांना मांदाडे समितीच्या प्रसिद्ध केलेल्या अहवालातील शिफारशींवर हरकती घ्यायच्या होत्या. परंतू मुदत संपल्यामुळे हे नागरिक आपल्या हरकती नोंदवू शकले नाहीत. अशा नागरिकांनी अहवालातील शिफारशींचा सखोल अभ्यास करून १५ एप्रिलपर्यंत महाराष्ट्र जलत्तंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे आपापल्या कायदेशीर, अभ्यासपूर्ण व समर्पक हरकती लेखी स्वरुपात किंवा ईमेल द्वारे प्राधिकरणाकडे पाठवाव्यात असे आवाहन आ.आशुतोष काळे यांनी केले आहे.

## शेअर बाजारात तुफान तेजी

राष्ट्रीय शेअर बाजाराचा (एनएसई) निफ्टी-५० देखील जोरदारपणे उघडला. व्यवहारादरम्यान तो २२,८५७.८० अंकांवर गेला होता. शेवटी, निफ्टी ३२५.५५ अंकांनी किंवा १.४५% च्या नेत्रदीपक वाढीसह २२,८३४.३० वर बंद झाला.

**सर्वाधिक नफा मिळवणारे शेअर्स**

बीएसई ३० कंपन्यांपैकी झोमॅटोचे शेअर्स ७% पेक्षा जास्त वधारले. आयसीआयसीआय बँक, टाटा मोटर्स, एल अँड टी, महिंद्रा अँड महिंद्रा, हिंदुस्तान युनिलिव्हर, पॉवर ग्रिड, एचडीएफसी बँक, टीसीएस आणि अदानी पोर्ट्स हे देखील आघाडीवर आहेत.

**शेअर बाजारात वाढ होण्याचे कारण**

वाजवी मूल्यांकनामुळे देशांतर्गत शेअर बाजारात खरेदी दिसून येत आहे. विशेषतः अलिकडच्या सुधारणांनंतर, हाय-कॅप स्टॉक्समध्ये चांगली खरेदी दिसून येत आहे. निफ्टी ५० चा सध्याचा पीई (किंमत-कमाई गुणोत्तर) २० वर आहे, जो तीन महिन्यांच्या नीचांकी पातळीच्या जवळ आहे.

याशिवाय, अलिकडच्या समष्टि आर्थिक परिस्थितीमुळे आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या शेवटच्या तिमाहीत कॉर्पोरेट उत्पन्नात सुधारणा होण्याची अपेक्षा वाढली आहे, ज्यामुळे बाजाराच्या भावनांवर परिणाम होत आहे. चलनवाढीचा दर रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्क्यांच्या लक्ष्य पातळीपेक्षा कमी होत असल्याने, मध्यवर्ती बँक विकासाला पाठिंबा देण्यावर लक्ष केंद्रित करू शकते आणि चालू चक्रात बेंचमार्क धोरण दरांमध्ये लक्षणीय कपात करू शकते अशी अपेक्षा वाढली आहे.

मंगळवारी रुपयाने तीन आठवड्यांहून अधिक काळातील सर्वोच्च पातळी गाठली. डॉलरच्या सततच्या कमकुवतपणामुळे रुपयाला आधार मिळाला, जो प्रमुख समकक्ष चलनांच्या तुलनेत पाच महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आला. अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपया ८६.५४ वर पोहोचला, जो २१ फेब्रुवारीनंतरचा सर्वोच्च स्तर आहे. त्यानंतर तो ०.२% वाढीसह ८६.५७ वर बंद झाला.

**एमकॅप पुन्हा ४०० लाख कोटी ओलांडला**

सलग दोन ट्रेडिंग सत्रांमध्ये बाजारात झालेल्या वाढीमुळे, बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप पुन्हा ४०० लाख कोटी रुपयांच्या जवळ गेले. गेल्या काही काळापासून बाजारात घसरण झाल्यामुळे ते ४०० लाख कोटी रुपयांच्या मानसिक पातळीच्या खाली घसरले होते.

## जिल्ह्यात ८ लाख एससी...

फेब्रुवारी महिन्यांत तयार करण्यात आलेल्या आकडेवारीत नगर जिल्ह्यात ३६ लाख ५३ हजार ३३९ ग्रामीण लोकसंख्येचा अंदाज व्यक्त करून त्यात ४ लाख ४७ हजार ६९५ अनुसूचित जातीची, तर ३ लाख ५५ हजार ३७४ अनुसूचित जमातीची लोकसंख्या दाखवण्यात आली होती. आता सुधारित आकडेवारीत जिल्ह्यात ४ लाख ४४ हजार ५४८ अनुसूचित जातीची आणि ३ लाख ५६ हजार ७४० अनुसूचित जमातीची लोकसंख्या दाखवण्यात आली आहे.

याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने नव्याने तयार केलेल्या अहवालात जिल्ह्याच्या २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण क्षेत्राची तालुकानिहाय लोकसंख्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या तुलनेत बरोबर असून ती निश्चित करताना जिल्हा परिषद व त्या अंतर्गत असलेल्या पंचायत समितीच्या क्षेत्रातील कोणताही भाग वगळण्यात आलेला नाही. तसेच महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती छावणी क्षेत्र आदी नागरी भागातील लोकसंख्येला यातून वगळण्यात आलेले आहे. त्यानुसार नगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आठ लाख अनुसूचित जाती जमातीचे लोकसंख्या असल्याचे नमुद करण्यात आले आहे.

**अशी आहे मागासवर्गीय लोकसंख्या**

अहिल्यानगर ४६,३२२ जाती आणि १० हजार २३ जमाती, पारनेर १८ हजार २२७ जाती १६ हजार ९२४ जमाती, पाथर्डी २२ हजार ६०१ जाती आणि ३ हजार ९०० जमाती. शेवगाव ३१ हजार १९३ जाती आणि ४ हजार २४३ जमाती. राहुरी २३ हजार ३०६ जाती आणि ३० हजार ४५ जमाती. राहाता ४३ हजार ८५२ जाती आणि १७ हजार ८२९ जमाती. संगमनेर ३७ हजार ३२८ जाती ५० हजार ५८८ जमाती. कोपरगाव २८ हजार ३१७ जाती आणि ३२ हजार ८०१ जमाती. नेवासा ४९ हजार २३५ जाती आणि १ हजार ६६७ जमाती. श्रीरामपूर ३८ हजार ७७४ जाती आणि १७ हजार ५८३ जमाती. अकोले १६ हजार ६७० जाती आणि १ लाख ३८ हजार १६८ जमाती. कर्जत ३१ हजार ३१० जाती आणि ३ हजार २८४ जमाती. जामखेड १६ हजार ६६ जाती आणि १ हजार ९२ जमाती, तर श्रीगोंदा ३६ हजार ३०३ जाती आणि १३ हजार २९३ जमाती अशी लोकसंख्या दाखवण्यात आली आहे.

## फसवणूक टाळण्यासाठी...

करण्याची मागणी केंद्र सरकारकडे करण्यात येईल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बीड जिल्हयातील ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सो. लिमीटेड या बँकेच्या राज्यभरातील ५० शाखांमधील फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांची संख्या २० हजार ८०२ असून त्यांची ११२१.४७ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झाली आहे. या बँकेच्या चेअरमन व संचालक यांच्याकडून ठेवीदारांना ठेवी परत करण्यासाठी वारंवार तारखा देण्यात आल्या. परंतु ठरलेल्या तारखेला ठेवीदारांना ठेवी परत करण्यास टाळाटाळ करण्यात आली. या पतसंस्थेकडून फसवणूक झालेल्या ठेवीदारांचे पैसे जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांचा लिलाव करून परत केले जातील, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी बाबत ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांच्या हिताचे संरक्षण कायद्यानुसार ८० मालमत्ता निश्चित करण्यात आल्या आहेत. या ८० मालमत्ता जप्त करून कायद्यानुसार त्याचा लिलाव करण्यात येईल. या मालमत्तांची किंमत ६ हजार कोटी रुपये आहे. मालमत्ता लिलावाची कार्यवाही अधिक गतीने पूर्ण करून ठेवीदारांचे पैसे परत करण्यात येतील. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य नाना पटोले, बबनराव लोणीकर, राहुल पाटील यांनीही उपप्रश्न उपस्थित केले.

## नागपूरमधील हिंसाचार...

फडणवीस यांनी बजावले.

मुख्यमंत्री फडणवीस यांचे शहर असलेल्या नागपूरमध्ये सोमवारी रात्री दोन गटात संघर्ष झाला. या संघर्षाचे पर्यवसन दंगलीत झाले. या दंगलीत हल्लेखोरांनी पोलिसांना लक्ष्य केले. या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत निवेदन करून नागपूर हिंसाचार प्रकरणी सरकारची भूमिका स्पष्ट केली. सोमवारी सकाळी साडेअकरा वाजता महाल परिसरात विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी औरंगजेब कबर हटाओ म्हणत आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी गवताची प्रतिकात्मक कबरही जाळली. त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. संध्याकाळी अफवा पसरविली गेली की जी प्रतिकात्मक कबर जाळली त्यावर धार्मिक मजकूर होता. नमाज आटोपल्यानंतर जमाव जमला आणि घोषणा दिल्या. हंसापुरी भागात २०० ते ३०० च्या जमावाने दगडफेक सुरु केली. त्यात १२ दुचाकींचे नुकसान झाले. संध्याकाळी साडेसात वाजता दुसरी घटना घडली. त्यात एक क्रेन आणि जेसीबी जाळण्यात आला. संध्याकाळी काही लोकांनी जाणीवपूर्वक हल्ला केला, कारण तिथे एक ट्रॉलीभरून दगड मिळाले. काही लोकांनी दगड जमा करून ठेवले होते. शस्त्रे देखील मोठया प्रमाणात जप्त करण्यात आली. ठरवून काही घरे आणि दुकानांना लक्ष्य करण्यात आले, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. जमावाच्या हल्ल्यात तीन उपायुक्तांसह ३३ पोलीस जखमी झाले आहेत. जखमींपैकी एक पोलीस अतिदक्षता विभागात उपचार घेत आहे. या प्रकरणी एकूण पाच गुन्हे दाखल करण्यात आले असून ११ पोलीस ठाण्याच्या हद्दीत संचारबंदी घोषित करण्यात आली आहे. राज्य राखीव पोलीस दलाच्या पाच तुकडया तैनात करण्यात आल्या आहेत. पोलीस महासंचालकांनी राज्यभर कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे निर्देश दिले आहेत, असे फडणवीस म्हणाले. छावा या चित्रपटाने खरा इतिहास समोर आणला. पण त्यानंतर राज्यात लोकांच्या भावना प्रज्वलित झाल्या आहेत. औरंगजेबाबद्दलचा राग बाहेर येतो आहे. असे असले तरी सर्वांनी संयम राखला पाहिजे, असे आवाहनही फडणवीस यांनी केले. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर यांनी जालना शहरात देखील छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान करण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर या प्रकरणी पोलीस कठोर कारवाई करतील, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

**या प्रकरणाच्या मुळाशी सरकार जाईल- उपमुख्यमंत्री शिंदे**

दरम्यान, राज्यात गेल्या काही दिवसांपासून औरंगजेबाचे उदात्तीकरण का सुरू आहे आणि ते कोणी सुरू केले याच्या मुळाशी सरकार जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी स्पष्ट केले. औरंग्याचे उदात्तीकरण करणे म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान करणे असून हा देशद्रोहच आहे. औरंग्या महाराष्ट्राचा घास घ्यायला आला होता. असा इतिहास असताना औरंग्याचे उदात्तीकरण कशासाठी? सच्चा देशभक्त मुसलमान देखील औरंग्याचे समर्थन करणार नाही. औरंगजेब कोण संत होता का? असा सवाल शिंदे यांनी केला.

नागपूरमध्ये आंदोलनानंतर पोलिसांनी मध्यस्थी करून दोन्ही समाजाला शांत केले होते. मात्र काही तासांत लगेचच दोन-पाच हजाराचा जमाव कसा जमला. घरात मोठे दगड टाकले. रुग्णालयाची तोडफोड केली. एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य केले गेले. दंगखोरांकडे पेट्रोल बॉम्ब कुठून आले. वाहनेही जाळण्यात आली. याचा अर्थ हे नियोजनपूर्वक षडयंत्र होते. असे असताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ मुख्यमंत्री फडणवीसांची तुलना औरंगजेबाशी करतात. याबद्दल सपकाळ यांनी माफी मागितली पाहिजे, अशी मागणीही एकनाथ शिंदे यांनी केली.

## शिर्डीत चॉपरने तरुणावर हल्ला

ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याचे काम सुरू केले आहे. तसेच रात्रीच्या वेळी देखील पोलिसांची गस्त वाढवली आहे. तरी देखील शिर्डीत असा प्रकार घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत आहे. या घटने संदर्भात शिर्डी पोलीस ठाण्यात रात्री उशिरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

## देवगड हापूस आंब्यांवर...

हे वास्तविक देवगडमधील नाहीत. गेल्या तीन दशकांपासून इतर भागांतील निकृष्ट दर्जाचे आंबे सर्रास देवगड हापूस म्हणून विकले जात आहेत. त्यामुळे देवगडमधील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, त्याचे गंभीर सामाजिक दुष्परिणाम देखील होत आहेत. त्यामुळेच हापूस (अल्फोन्सो)फच्या जीआय टॅगची रजिस्टर्ड प्रोप्रायटर या नात्याने प्राप्त होणाऱ्या अधिकारांचा वापर करून संस्थेने 'टँपर प्रूफ युआयडी सील' सक्तीचे करण्याचा हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पाकरिता 'टँपर प्रूफ युआयडी सील' चे पेटंट असलेल्या संस्थेने मुंबई स्थित सन सोल्यूशन्स संस्थेबरोबर करार केला आहे.

**टँपर प्रूफ युआयडी सील स्टिकर प्रणाली कशी काम करते?**

देवगड तालुका आंबा उत्पादक सहकारी संस्थेने जीआय नोंदणीकृत शेतकऱ्यांना त्यांच्याकडील झाडांची संख्या व त्यांच्या उत्पादन क्षमतेनुसार टँपर प्रूफ युआयडी सीलफ वितरित केले आहेत. शेतकऱ्यांनी बाजारात पाठवलेल्या प्रत्येक देवगड हापूस आंब्यावर हा युआयडी स्टिकर लावणे बंधनकारक असेल.

प्रत्येक स्टीकर दोन भागात विभागलेला एक स्वतंत्र युआयडी असतो. त्या कोड चा एक भाग स्टीकर च्या वरती आणि दूसरा भाग स्टीकर च्या खाली असतो. आपल्याकडील आंबा देवगड चाच आहे का हे तपासण्यासाठी ग्राहकांनी +९१ ९१६७ ६६८८९९ या क्रमांकावर व्हॉट्सअ‍ॅप च्या माध्यमातून फोटो पाठवायचा आहे. ही सिस्टम (प्रणाली) त्या स्टीकर वरील कोड वाचते आणि स्टीकर च्या मागील नंबर लिहून पाठवण्यास सांगते. नंबर वाचण्यासाठी स्टीकर काढले असता त्याचे आपोआप दोन भाग होतात. जर व्हॉट्सअ‍ॅप द्वारे आलेला संपूर्ण कोड सिस्टममधील युआयडी शी जुळला, तर ग्राहकास शेतकरी/विक्रेत्याचे नाव, मूळ गाव, जीआय नोंदणी क्रमांक इत्यादी तपशील पाठवला जाईल.

या पडताळणी प्रक्रियेमुळे देवगड हापूसफ बाबतची विश्वसनीयता वाढेल आणि देवगड हापूस च्या जागतिक कीर्तीचे रक्षण करण्यास मदत होईल. तोतयागिरी करणाऱ्या आणि देवगड हापूसच्या नावाखाली बनावट आंब्यांची विक्री करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई जीआय नोंदणी शिवाय आणि युआयडी स्टीकर असल्याशिवाय देवगड हापूसच्या नावाने विक्री करताना कोणी आढळल्यास जीआय कायदा १९९९ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ च्या तरतुदींच्या अंतर्गत दखलपात्र गुन्हा आहे.

जीआय कायदा १९९९ अंतर्गत: कलम ३९ आणि ४० - अन्वये जीआय नोंदणी नसताना जीआय उत्पादन विकणे हे गुन्हा असून अशा गुन्ह्याला शिक्षा ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि २ लाखांपर्यंत दंडाची तरतूद आहे.

कलम ५० - अन्वये हे गुन्हे दखलपात्र गुन्हे म्हणून वर्गीकृत आहेत आणि अटकेस पात्र आहेत. याच्या जोडीला, भारतीय न्याय संहिता २०२३ च्या तरतुदी नुसार: कलम ३४९ आणि ३५० यांच्या तरतुदीनुसार बनावट नावाने मालाची करण्यासाठी १ ते ३ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि/किंवा दंड अशी तरतूद आहे.

तरी व्यापारी, दलाल आणि किरकोळ विक्रेते यांनी तोतयागिरी आणि बनावट विक्री करण्यापासून दूर राहावे असे आवाहन संस्थेने केले आहे. जीआय नोंदणी नसलेले आणि टँपर प्रूफ युआयडी सील स्टिकर नसलेले कोणीही देवगड हापूस च्या नावाने विक्री करताना आढळल्यास त्यांच्या विरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असा इशारा देखील संस्थेने दिला आहे.

## पालिका, झेडपी निवडणुका...

मोठी बातमी समोर आली आहे. राज्यातील महापालिका निवडणुका येत्या ऑक्टोबर महिन्यानंतरच लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या ऑक्टोबर महिन्यानंतरच महापालिकेच्या निवडणुका लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. येत्या ४ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात महापालिका निवडणुकासंदर्भातील पुढील सुनावणी होणार आहे. या सुनावणीवेळी सर्वोच्च न्यायलयाने निकाल दिला तरी महापालिकेची निवडणूक ही ऑक्टोबरनंतरच लागू शकते, असे बोललं जात आहे. येत्या मे महिन्यात निकाल लागला तरीदेखील महापालिका निवडणुका पावसाळ्यापूर्वी घेता येणार नाहीत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निकाल लागल्यानंतर जवळपास १०० दिवस प्रशासकांना निवडणुकीची तयारी करायला वेळ लागणार आहे. तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची आणि राज्य निवडणूक आयोगाची नुकतीच बैठक पार पडली. यावेळी निवडणुकीसंदर्भात चर्चा झाली. कोर्टाने निकाल दिल्यानंतर पालिकेला जवळपास १०० दिवस आढावा आणि तयारीसाठी लागेल, अशी माहिती समोर आली आहे. यामध्ये वॉर्ड रचना, यादी तपासणी, हरकती मागवणे, आरक्षण सोडत या बाबींचा समावेश असणार आहे. त्यामुळे महापालिका निवडणूक ऑक्टोबर महिन्यानंतरच घेतली जाईल, असे बोललं जात आहे.